**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. मोहन ज्ञानदेव धोत्रे
मु.पो.वाडीपीर, ता. करवीर, जि. कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, करवीर, ता. करवीर, जि. कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, करवीर, ता. करवीर, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४४१ / २००९ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७.११.२००९ |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** — श्री. मोहन ज्ञानदेव धोत्रे, मु.पो.वाडीपीर, ता. करवीर, जि. कोल्हापूर<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा — तहसीलदार, करवीर, ता. करवीर, जि. कोल्हापूर, श्री. बाबासाहेब भाऊसाहेब वाघमोडे | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १४.९.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १६.१०.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२.३.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १९.५.२००९ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

कब्जेगहाण दिलेल्या जमिनीवर झालेल्या नोंदी कशाच्या आधारे करण्यात आल्या, याची माहिती दिली जात नसल्याची तक्रार अपीलकर्ता श्री. मोहन ज्ञानदेव धोत्रे यांनी केली.

श्री. धोत्रे माहिती मागत असलेली नोंद सन १९४५ मधील आहे. त्या संदर्भातील उपलब्ध अभिलेखांच्या प्रती त्यांना देण्यात आल्या असून संबंधित संचिकाही अवलोकनासाठी उपलब्ध करून दिल्या होत्या. क्षेत्राबाबत तक्रार असल्यास महसूल अधिनियमांतर्गत पुनर्विलोकनासाठी अपीलकर्त्यास दाद मागावी लागेल, याबाबत त्यांना कल्पना देण्यात आली आहे. याच विषयासंदर्भात श्री. धोत्रे यांचे अपील क्र. ७०/कोल्हापूर/२००७ मध्ये आयोगाने यापूर्वी निर्णय दिला आहे, असे प्रतिप्रादन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, करवीर, ता. करवीर श्री. बाबासाहेब वाघमोडे यांनी केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पहाता जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. १८.२.२०१०**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. अनिल दिनकर जाधव(आंबिल ढोक)
ताराराणी कॉलनी, २४४/४३,बी वॉर्ड,
संभाजीनगर, कोल्हापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,**
तहसील कार्यालय पन्हाळा,
जि.कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,**
तहसील कार्यालय पन्हाळा,
जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४४२/२००९/ कोल्हापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०३.०१.२००९ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे उत्तर दिल्याची तारीख | दि. ०५.०२.२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१.०२.२००९ |
| ५ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** माहिती- मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र - अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, पन्हाळा यांच्याकडून मागितलेली माहिती प्राप्त झाली नाही व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, पन्हाळा यांनी अपिलावर सुनावणी घेतली नाही म्हणून अपीलकर्ता श्री.अनिल दिनकर जाधव (आंबिलढोक) यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

मागणी केलेल्या माहितीची आपल्याला आता गरज नसल्याने आयोगाकडे दाखल केलेले अपील स्वत:हून मागे घेत असल्याचे निवेदन दि.२१.०८.२००९ रोजी अपीलकर्ता श्री. जाधव (आंबिलढोक) यांनी अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, पन्हाळा यांना दिले, त्या निवेदनाची प्रत अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, पन्हाळा यांनी आयोगाला सादर केली.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे:-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे..

**पुणे**

**दि.** 18 FEB 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

**(विजय कुवळेकर)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.लालासाहेब एम.साबळे
मु.पो.हणमंतवाडी, ता.फलटण, जि.सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
फलटण, ता.फलटण, जि.सातारा उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, श्रीराम विविध कार्यकारी
सहकारी सेवा सोसायटी मर्या., हणमंतवाडी, ता.फलटण, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४५५ / सातारा /२००९ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.११.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
फलटण, ता.फलटण, जि.सातारा श्री.सी.आर.भुजबळ

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, श्रीराम विविध कार्यकारी
सहकारी सेवा सोसायटी मर्या., हणमंतवाडी, ता.फलटण, जि.सातारा श्री.पी.एन.शिंदे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१६.३.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.८.४.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२९.४.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१.६.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.लालासाहेब एम.साबळे यांनी विस्तृत स्वरूपाची माहिती मागितली असून सुमारे १२०० हून जास्त पृष्ठे होतात. २५६१९ रूपये शुल्क त्यांना कळविले. हे शुल्क भरल्यास त्यांना माहिती देण्यात येईल, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सचिव, श्रीराम विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसायटी मर्या., हणमंतवाडी, ता.फलटण, जि.सातारा श्री.पी.एन.शिंदे यांनी केले.

संस्थेने आपल्याला पाठविलेली पत्रे मिळाली नाहीत, असे अपीलकर्त्याने प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी सांगितले होते. परंतु संस्थेने टपालाचा दाखला घेऊन विहित मुदतीत पत्र पाठविले असल्यामुळे आवश्यक असल्यास शुल्क भरून माहिती प्राप्त करून घ्यावी, असा निर्णय आपण प्रथम अपिलात दिला, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, फलटण, ता.फलटण, जि.सातारा यांचे प्रतिनिधी श्री.सी.आर.भुजबळ यांनी केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी योग्य कार्यवाही केली आहे. अपीलकर्त्यास माहिती आवश्यक असल्यास योग्य ते शुल्क भरून माहिती प्राप्त करून घेता येईल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २६.२.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. शिवाजी दत्तात्रय पवार
४१२, जुना बाजार गवळी वाडा,
खडकी बाजार, पुणे -३

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अधिकारी,**
खडकी कॅन्टोन्मेट बोर्ड,
खडकी, पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
खडकी कॅन्टोन्मेट बोर्ड,
खडकी, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४५६/२०१० पुणे |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २९/१/२००९ व १२/३/२००९ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२/३/२००९ व २५/५/२००९ |
| ४ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** मिळकत क्र. ४४७, जुना बाजार संदर्भातील एकूण १४ मुद्दयांबाबत माहिती व मिळकत क्र. ४८२ बाबतची एकूण २२ मुद्दयांबाबतची माहिती | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. शिवाजी दत्तात्रय पवार यांनी ज्या सार्वजनिक प्राधिकरणातील जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचेविरुध्द राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. ते सार्वजनिक प्राधिकरण हे केंद्रिय माहिती आयोगाच्या कार्यकक्षेतील असल्याने श्री. पवार यांनी आयोगाकडे केलेल्या अपीलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे:-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे
दि. 23 FEB 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.लक्ष्मण रघुनाथ ढेबे
जन्नीमाता हौसिंग सोसायटी, ससून रोड, महाबळेश्वर, जि.सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप वनसंरक्षक,
सातारा वनविभाग, जि.सातारा उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहा.वनसंरक्षक,
सातारा वनविभाग, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४६२ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.५.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.लक्ष्मण रघुनाथ ढेबे
जन्नीमाता हौसिंग सोसायटी, ससून रोड, महाबळेश्वर, जि.सातारा

**जन माहिती अधिकारी** तथा सहा.वनसंरक्षक,
सातारा वनविभाग, जि.सातारा श्री.बी.एन.सकट

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१३.२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४.४.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५.४.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. २२.५.२००८ व २.७.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२३.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.६.५.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

महाबळेश्वरमधील स्टॉल परवानगीच्या संदर्भातील आपण मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा सहा.वनसंरक्षक, सातारा वनविभाग, जि.सातारा यांनी दिली नाही. अपील केल्यानंतर अपूर्ण व चुकीची माहिती दिली. माहिती संकलित करण्यासाठी विलंब लागणार असल्याचे जन माहिती अधिकारी तथा सहा.वनसंरक्षक, सातारा वनविभाग, जि.सातारा व अपिलीय प्राधिकारी तथा उप वनसंरक्षक, सातारा वनविभाग, जि.सातारा यांनी म्हटले असले तरी संबंधित विषयाबाबत दर वर्षी शासनाला पत्रव्यवहार करावा लागत असल्यामुळे सकंलनासाठी अवधी लागण्याचा प्रश्न येत नाही. मूळ प्रस्तावाची प्रत अपील दाखल केल्यानंतर मिळाली, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.लक्ष्मण रघुनाथ ढेबे यांनी केले.

श्री.ढेबे यांनी २३ वर्षांच्या कालावधीतील विस्तृत माहिती मागितली होती. त्यामुळे माहिती देण्यास विलंब लागेल, हे त्यांना विहित मुदतीत कळविले होते. वनक्षेत्रपाल, महाबळेश्वर यांच्यामार्फत देऊ केलेली माहिती त्यांनी नाकारल्यामुळे रजिस्टर्ड टपालाने माहिती पाठविली. अपीलकर्ता कार्यालयात नेहमी येत असतात, त्यामुळे संचिकांचे अवलोकन करावे व आवश्यक माहिती घ्यावी, असेही त्यांना सांगितले होते. मूळ प्रस्तावाची मागणी त्यांच्या मूळ अर्जात नव्हती. ती त्यांनी प्रथम अपिलाच्या वेळी केली, तीही त्यांना दिली, असे जन माहिती अधिकारी तथा

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५.४.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. २२.५.२००८ व २.७.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२३.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.६.५.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

महाबळेश्वरमधील स्टॉल परवानगीच्या संदर्भातील आपण मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा सहा.वनसंरक्षक, सातारा वनविभाग, जि.सातारा यांनी दिली नाही. अपील केल्यानंतर अपूर्ण व चुकीची माहिती दिली. माहिती संकलित करण्यासाठी विलंब लागणार असल्याचे जन माहिती अधिकारी तथा सहा.वनसंरक्षक, सातारा वनविभाग, जि.सातारा व अपिलीय प्राधिकारी तथा उप वनसंरक्षक, सातारा वनविभाग, जि.सातारा यांनी म्हटले असले तरी संबंधित विषयाबाबत दर वर्षी शासनाला पत्रव्यवहार करावा लागत असल्यामुळे सकंलनासाठी अवधी लागण्याचा प्रश्न येत नाही. मूळ प्रस्तावाची प्रत अपील दाखल केल्यानंतर मिळाली, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.लक्ष्मण रघुनाथ ढेबे यांनी केले.

श्री.ढेबे यांनी २३ वर्षांच्या कालावधीतील विस्तृत माहिती मागितली होती. त्यामुळे माहिती देण्यास विलंब लागेल, हे त्यांना विहित मुदतीत कळविले होते. वनक्षेत्रपाल, महाबळेश्वर यांच्यामार्फत देऊ केलेली माहिती त्यांनी नाकारल्यामुळे रजिस्टर्ड टपालाने माहिती पाठविली. अपीलकर्ता कार्यालयात नेहमी येत असतात, त्यामुळे संचिकांचे अवलोकन करावे व आवश्यक माहिती घ्यावी, असेही त्यांना सांगितले होते. मूळ प्रस्तावाची मागणी त्यांच्या मूळ अर्जात नव्हती. ती त्यांनी प्रथम अपिलाच्या वेळी केली, तीही त्यांना दिली, असे जन माहिती अधिकारी तथा

सहा.वनसंरक्षक, सातारा वनविभाग, जि.सातारा श्री.बी.एन.सकट यांनी पूरक कागदपत्रांसह निवेदन केले. ते मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि.१८.२.२०१०

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.परशुराम बंडू पाटील
३१५, खेडे, ता.आजरा, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, आजरा, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
आजरा, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४६४+४६५ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२४.६.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.परशुराम बंडू पाटील
३१५, खेडे, ता.आजरा, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, आजरा, जि.कोल्हापूर श्री.बी.एस.पवार

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
आजरा, जि.कोल्हापूर श्री.व्ही.के.नाईक

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४.६.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३.७.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३१.७.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०.८.२००८ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.३०.१२.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.२४.६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सन १९७५ व सन २००० मधील विशिष्ट व्यक्तींच्या नावे असलेल्या जमिनीच्या संदर्भातील माहिती कमाल जमीन धारणा कायद्याच्या अनुषंगाने मागितली असता चुकीची दिली. सन १९७१ मध्ये सात-ब चा अंमल झाला असून त्याची माहिती दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.परशुराम बंडू पाटील यांनी केली.

श्री.पाटील यांनी मागितलेल्या माहितीच्या अनुषंगाने शोध घेऊन विहित मदुतीत उत्तर देऊन उपलब्ध माहिती त्यांना दिली. तसेच सन १९७७-७८ सालाच्या पिकपहाणीच्या नोंदीबाबत सात-ब ची कार्यपध्दती अंमलात येण्यापूर्वीच्या नोंदीच्या अनुषंगाने प्रकरणाचा क्रमांक व तारीख कळविण्याची विनंती श्री.पाटील यानी केली. ती दिल्यास मूळ कागदपत्रे शोधणे शक्य झाले असते. परंतु असा तपशील त्यांनी दिला नाही. दोन्ही अर्जांतील अन्य सर्व माहिती देण्यात आली आहे, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, आजरा, जि.कोल्हापूर श्री.व्ही.के.नाईक यांनी संबंधित लिपिक, अभिलेखापाल व अव्वल कारकून यांच्या निवेदनांच्या प्रतींसह केले. तसेच संबंधित कागदपत्रांच्या जतनाचा कालावधी तीस वर्षे असल्याचेही त्यांनी सांगितले.

जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, आजरा, जि.कोल्हापूर यांचे निवेदन लक्षात घेता अभिलेखाच्या जतनाचा कालावधी संपून गेलेला असूनही प्रकरणाचा दिनांक व

क्रमांक अपीलकर्त्याने दिल्यास शोध घेण्याची तयारी दर्शविली आहे, हे लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २६.२.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. दत्तात्रय ज्योती अडसुळे
७१३,ए वार्ड ,
गंजमाळ, कोल्हापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
सहकारी संस्था,
कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४७८/२०१० /कोल्हापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१/१२/२००९ |
| ३ | **मूळ माहिती अर्जान्वये केलेली मागणी :-**<br>श्री बलभीम को-ऑप, बँकेतील एससी / एसटी नोकर भरतीबाबत | |

**विवेचन**

अपिलकर्ता श्री. दत्तात्रय ज्योती अडसुळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडलेल्या कागदपत्रांवरुन त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(१) अन्वये आवश्यक असणारे प्रथम अपील अपिलीय प्राधिका-याकडे केलेले नाही. सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 26 FEB 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. प्रकाश कृष्णा चौगुले
पिंपळगाव खुर्द, कागल,
कोल्हापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),**
जिल्हा परिषद, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४८४/२०१० /कोल्हापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १३/८/२००७ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७/९/२००९ |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र -अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने आवश्यक असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**विवेचन**

अपिलकर्ता श्री. प्रकाश कृष्णा चौगुले यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेला निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे जोडली नाहीत व अपुरे मुद्रांक शुल्क जोडले आहे.(आवश्यक शुल्क रु.२०/- चे मुद्रांक अथवा पोस्टल ऑर्डर ऐवजी रु.१०/-) यास्तव त्यांनी आयोगाकडे केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**(विजय कुंवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**पुणे.**
**दि :-** 26 FEB 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. संपत पांडुरंग आबदार
"अवधूत," जयभवानी कॉलनी,
रिंग रोड, फुलेवाडी,
कोल्हापूर -४१६०१० **अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
राष्ट्रीय महामार्ग विभाग क्र.-७,
कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता,**
राष्ट्रीय महामार्ग उपविभाग क्र.-२३,
कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४८६/२०१० /कोल्हापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३/१०/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७/२/२००९ |
| ४ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १३/४/२००९ |
| ५ | **मूळ माहिती अर्जान्वये केलेली मागणी :-** सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे अंतर्गत केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्रालयाकडून उपलब्ध निधीच्या केलेल्या अपहाराबाबतची माहिती. | |

**विवेचन**

अपिलकर्ता श्री. संपत पांडुरंग आबदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधिल तरतुदीन्वये विहित केलेल्या ९० दिवसांच्या कालावधीत केलेले नसल्याने ते मुदतबाहय आहे. तसेच त्यांनी अपिलासोबत आवश्यक शुल्क (रु.२०/- चे मुद्रांक अथवा पोस्टल ऑर्डर) जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 26 FEB 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

मे.कोल्हापूर कृषी उत्पन्न बाजार समिती
शाहू मार्केट यार्ड,
कोल्हापूर **अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,** **उत्तरवादी**
सहकारी संस्था,
कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४८७/२०१०/कोल्हापूर |
| २ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २०/८/२००९ |
| ३ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १८/९/२००९ |
| ४ | **मूळ माहिती अर्जान्वये केलेली मागणी :-** मलकापूर,ता. शाहुवाडी येथे खरेदी केलेल्या जागेबाबत. | |

**विवेचन**

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) अन्वये अपील नागरिक व्यक्तीच्या नावे असणे आवश्यक आहे; संस्थेच्या नाही. सबब कोल्हापूर कृषी उत्पन्न बाजार समिती यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपीलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त.
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 26 FEB 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. सुनील बाबासाहेब पाटील
F-2 विजया अपार्टमेंट, प्लॉट नं.३७,
एसटी कॉलनी, राजारामपुरी,
कोल्हापूर -४१६००८

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त (I),**
कोल्हापूर महानगरपालिका,
कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उपशहर अभियंता,**
वि.का.क्र.३,
कोल्हापूर महानगरपालिका,
कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४८८/२०१० /कोल्हापूर |
| २ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ४/११/२००९ |
| ३ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २६/११/२००९ |
| ४ | **मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती :-**<br>सि.स.नं. ३७३ प्लॉट नं. ३७ एस.टी. कॉलनी कोल्हापूर येथील इमारत बांधकामाबाबत | |

## विवेचन

अपिलकर्ता श्री. सुनील बाबासाहेब पाटील यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 26 FEB 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री.दिलीप गुलाबराव बोंद्रे
१०१, ॲकेशिया सिल्व्हर व्हॅली हौ. सोसा.
तात्या टोपे सोसा. पाठीमागे,
फातीमानगर, वानवडी, पुणे **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** पोलीस उप आयुक्त (मुख्या-२),
पोलीस आयक्त पुणे शहर यांचे कार्यालय, पुणे-१ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** सहायक पोलीस आयुक्त,
पोलीस आयक्त पुणे शहर यांचे कार्यालय, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५००/२०१०/पुणे |
| २ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१०.१२.२००९ |
| ३ | **मूळ माहिती अर्जान्वये केलेली मागणी -** सहायक पोलीस निरीक्षक ते पोलीस निरीक्षक या पदावर दि.१९.११.२००१ च्या आदेशानुसार पदोन्नती का देण्यात आली नाही, याबाबतचा खुलासा | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.दिलीप गुलाबराव बोंद्रे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र-अ, जोडपत्र-ब इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतूदीनुसार खुलासा, स्पष्टीकरण मागता येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**स्थळ : पुणे**
**दिनांक :** 26 FEB 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.वामन गंगाधर नानजकर
१४४, लक्ष्मी पेठ, दमाणी नगर, सोलापूर **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार,
जुन्नर तहसील कार्यालय, ता.जुन्नर,जि.पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** निवासी नायब तहसीलदार,
जुन्नर तहसील कार्यालय, ता.जुन्नर,जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५०६/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.११.२००९ |
| **३.** | **उपस्थित**<br>**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार,<br>जुन्नर तहसील कार्यालय, ता.जुन्नर,जि.पुणे श्री.धनाजी विष्णू तोरस्कर | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.४.५.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१.६.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.७.६.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१८.७.२००७ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छाया प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

तहसीलदार जुन्नर,जि.पुणे यांनी दि.२८.१२.१९८८ रोजी जारी केलेल्या जातीच्या दाखल्याबाबतची माहिती जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार.जुन्नर तहसील कार्यालय, ता.जुन्नर,जि.पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,जुन्नर तहसील कार्यालय, ता.जुन्नर,जि.पुणे यांच्याकडून मिळाली नाही. ही कागदपत्रे अभिलेख कक्षात आढळून येत नसल्याचे

देता येत नसल्याचे त्यांनी कळविले, म्हणून अपीलकर्ता श्री.वामन गंगाधर नानजकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.नानजकर यांनी मागितलेल्या माहितीबाबत सखोल शोध घेण्यात आला. स्वतंत्र पथकाद्वारेही अभिलेखाची तपसणी करण्यात आली. मात्र सन १९८८ च्या जातीचे दाखले असणारे मूळ दप्तराची यादी तपासली असता श्री.नानजकर यांनी नमूद केलेल्या क्रमांकाचा दाखला उपलब्ध झालेला नाही. संबंधित रजिस्टरच्या जतनाचा कालावधी ३० वर्षांचा आहे. शोध घेऊन प्राप्त झाल्यास अपीलकर्त्यास माहिती दिली जाईल, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,जुन्नर तहसील कार्यालय, ता.जुन्नर,जि.पुणे श्री.धनाजी विष्णू तोरस्कर यांनी केले. हे लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील निकली.

२. संबंधित दाखल्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, जुन्नर तहसील कार्यालय, ता.जुन्नर,जि.पुणे श्री.धनाजी विष्णू तोरस्कर यांनी दि.३१.०३.२०१० पर्यंत आयोगास सादर करावा.

**स्थळ : पुणे**
**दि. :** 26 FEB 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. विजय मारुती देशमुख
मु.पो.वेढा, ता.जावळी, जि.सातारा **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** जिल्हा शक्य चिकित्सक,
सामान्य रुग्णालय सातारा, जि.सातारा **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** वैद्यकीय अधीक्षक,
ग्रामीण रुग्णालय, मेढा, ता.जावळी, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५६६/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८.०३.२००९ |
| ३. | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता-** श्री. विजय मारुती देशमुख<br>मु.पो.वेढा, ता.जावळी, जि.सातारा<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा** जिल्हा शक्य चिकित्सक,<br>सामान्य रुग्णालय सातारा, जि.सातारा<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** वैद्यकीय अधीक्षक,<br>ग्रामीण रुग्णालय, मेढा, ता.जावळी, जि.सातारा | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

आपल्याला ९ दिवस विलंबाने माहिती मिळाली त्याबद्दल जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय, मेढा, ता.जावळी, जि.सातारा यांना शास्ती व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. विजय मारुती देशमुख यांनी केली.

कार्यालयातील अधिकाऱ्यांच्या बदल्या व कार्यभार हस्तांतरणाची प्रक्रिया यामुळे माहिती देण्यास ९ दिवस विलंब झाला. अपीलकर्त्यास त्याची कल्पना देऊन क्षमायाचना केली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय, मेढा, ता.जावळी, जि.सातारा श्री. जी.के.देसाई व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा शक्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, सातारा, जि.सातारा यांचे प्रतिनिधी श्री.ए.बी.भोसले यांनी विस्ताराने नमूद केले. त्यांचे स्पष्टीकरण मान्य करुन विलंब क्षमापित करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दिनांक : १८/०२/२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. संजय परशुराम पाटील
इंडियन एक्सप्रेस समुह, मार्केटिंग विभाग,
एक्सप्रेस टॉवर, नरिमन पॉईट, मुंबई-२१ — अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, चंदगड, ता. चंदगड, जि. कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, चंदगड, ता. चंदगड,
जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५१७ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४.६.२००९ |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री. संजय परशुराम पाटील, इंडियन एक्सप्रेस समुह, मार्केटिंग विभाग, एक्सप्रेस टॉवर, नरिमन पॉईट, मुंबई-२१<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, चंदगड, ता. चंदगड, जि. कोल्हापूर श्री. एम. एस. ऐतवडे | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २२.४.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०.५.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २०.६.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. ३०.१२.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. २४.६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आपल्यावर व आपले बंधू, वडील आदींवर झालेल्या अन्यायाच्या अनुषंगाने आपण ४२ मुद्दयांची माहिती मागितली होती. परंतु विलंबाने व अपुरी माहिती देण्यात आली. श्री. सतुराम कलाप्पा सावंत हे माजी सैनिक नसताना त्याना माजी सैनिक घोषित करून सेवानिवृत्ती वेतन दिले, परंतु त्याबाबतची माहिती पुरविली नाही. माहिती मागितल्यामुळे गेली दहा वर्षे गावगुंडांपासून पोलीस अधीक्षक आदी शासकीय यत्रंणांपर्यंत विविध पातळ्यांवर आपल्या कुटुंबाला त्रास दिला जात आहे. यातच आपले वडील व तरूण भाऊ यांचा मृत्यू झाला. अशी परिस्थिती असूनही अन्यायाविरूध्द लढण्यासाठी आवश्यक अशी कोणतीही माहिती दिली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. संजय परशुराम पाटील यांनी तोंडी व विस्तृत लेखी निवेदनांद्वारे केली.

श्री. पाटील यांनी मूळ अर्जात व पूरक कागदपत्रांमध्ये अनेक तक्रारी केल्या असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत देय ठरणारी माहिती त्यांना देण्यात आली. याच स्वरूपाचे अनेक अर्ज त्यांनी केले आहेत. कागदपत्रांनुसार उपलब्ध असणारी कोणतीही माहिती त्यांना हवी असल्यास दाखविण्याची व देण्याची तयारी आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, चंदगड श्री. एम. एस. ऐतवडे यांनी केले.

श्री. पाटील यांनी अनेक मुद्दयांमध्ये केलेली मागणी ही (उदा. मुद्दा क्र. १९, २२, ३९) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत 'माहिती' ठरत नाही. तसेच ढोबळ स्वरूपात (उदा. मुद्दा क्र.११, १३ व १४ ) माहिती मागितली आहे. अन्याय, अत्याचार आदीबाबतच्या त्यांच्या तक्रारी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाच्या नाहीत. मात्र श्री. सतुराम कलाप्पा सावंत हे माजी सैनिक आहेत की नाही, याची पुराव्यानिशी माहिती जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, चंदगड श्री. एम. एस. ऐतवडे यांनी आठ दिवसांत द्यावी, तसेच अन्य कार्यालयाकडील माहिती असल्यास त्या कार्यालयाकडे अर्ज वर्ग करणे

आवश्यक आहे. त्यानुसार कार्यवाही करून पंधरा दिवसांत माहिती देण्याचे आयोगाचे आदेश संबंधितांना कळवावेत, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. आयोगाच्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, चंदगड यांनी दि. १०.३.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा.

**पुणे**
**दि. १५.२.२०१०**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**